CMYK

**सारंगधर बालाजी दर्शन व महामानवांना अभिवादन करुन किशोरभाऊ गारोळेंच्या प्रचाराला मंगल सुरुवात** >> पान 2

**राष्ट्रपतींच्या हस्ते सहावे 'राष्ट्रीय जल पुरस्कार' प्रदान** >> पान 3

**मूल्यवर्धन तालुकास्तरीय/केंद्रस्तरीय शिक्षक प्रशिक्षण आदिवासी आश्रम शाळेत संपन्न** >> पान 4


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com   मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 105 ■ बुधवार, दि. 19 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


### सुविचार

''वाट बघा, योग्य वेळ येतेच.''



**धनुषच्या मॅनेजरवर तमिळ अभिनेत्रीचा गंभीर आरोप: म्हणाली- काम देण्याच्या बहाण्याने कास्टिंग काउचचा प्रयत्न केला, म्हणाला की ॲडजस्टमेंट करावे लागेल** आतील पान

# दिल्ली स्फोटाचे मुंबई कनेक्शन; ३ जण ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दिल्लीतील कार बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास जसजसा पुढे जात आहे, तसतसे नवे धागेदोरे समोर येत आहेत. या स्फोटाशी संबंधित महत्त्वाचे 'मुंबई कनेक्शन' आता उघड झाले आहे. मुंबई पोलिसांनी गुप्त माहितीनुसार शहरातील तीन जणांना ताब्यात घेतले आहे. हे तिघे दिल्ली स्फोटातील आरोपींशी सातत्याने संपर्कात असल्याचे तपासात उघड झाले आहे. पुढील चौकशीसाठी त्यांना दिल्लीला रवाना करण्यात आले आहे.

मुंबई पोलिसांच्या विशेष पथकाने केलेल्या गुप्त कारवाईत

## दिल्लीत कसून चौकशी सुरू

हे तिघे शहरातील वेगवेगळ्या भागांतून पकडण्यात आले. प्राथमिक चौकशीमध्ये धक्कादायक बाब समोर आली आहे. हे तिघेही एका विशिष्ट सोशल मीडिया प्लिकेशनच्या माध्यमातून दिल्लीतील आरोपींशी जोडले गेले होते. विशेष म्हणजे, या तिघांचे आर्थिक पार्श्र्वभूमीही सक्षम असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

तपासात आणखी एक महत्त्वाची बाब उघडकीस आली आहे. स्फोटाचा मुख्य सूत्रधार उमर नबीने तीन महिन्यांपूर्वी एक 'एन्क्रिप्टेड सिग्नल ग्रुप' तयार केला होता. या गटात हे तिघेही सदस्य म्हणून जोडले गेले होते. या पवरील चॅट आणि कॉल्स उच्चस्तरीय एन्क्रिप्शनमध्ये असल्याने संभाषण आणि पुरावे मिळवणे तपास यंत्रणांसाठी मोठे आव्हान ठरत आहे.

सध्या या पमध्ये असणारी चॅट हिस्ट्री, कॉल लॉग्ज, शेअर केलेल्या फाइल्स आणि डिजिटल ट्रेस तपासण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान असलेल्या डिजिटल फॉरेन्सिक टीमकडे पाठवण्यात आल्या आहेत. या तपासातून आरोपींच्या संवादांची नेमकी माहिती, योजनांची आखणी आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित महत्त्वाचे पुरावे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



## फडणवीसांनी शिंदेंसमोरच शिवसेनेच्या मंत्र्यांना पुराव्यासह झापले

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीला बहिष्कार घातला. शिवसेनेकडून केवळ एकनाथ शिंदे हे मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपस्थित होते. भाजपकडून करण्यात येणाऱ्या फोडाफोडीमुळे शिवसेनेचे मंत्री नाराज असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीला शिवसेनेचे मंत्री गैरहजर राहिले.मंत्रिमंडळाची बैठक संपल्यानंतर शिवसेनेचे मंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात भेटीसाठी गेले होते. यावेळी तुम्ही जे करताय, ते योग्य नाही, असं शिवसेनेचे मंत्री देवेंद्र फडणवीसांना म्हणाले. तसेच कल्याण-डोंबिवलीतल्या ऑपरेशन लोटसवरुन देवेंद्र फडणवीसांकडे तक्रार देखील केली. यावेळी देवेंद्र फडणवीसांनी देखील शिवसेनेच्या मंत्र्यांना एकनाथ शिंदेंसमोर चांगलेच सुनावले. गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक आणि भरत गोगावले हे मंत्री मुख्यमंत्र्यांना भेटीला जात नाराजी व्यक्त करायला गेले होते. यावेळी तुम्ही उल्हासनगरमध्येही हेच करताय, असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी शिंदेंच्या या मंत्र्यांना सुनावलं.

## पार्थ पवार प्रकरणावरून अंजली दमानिया आक्रमक, आज करणार मोठा गौप्यस्फोट

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील एका जमीन व्यवहार प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर गंभीर आरोप झाल्याने मागील काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे. विरोधकांनी पार्थ पवार यांच्या कंपनीने तब्बल १८०० कोटींच्या जमीन व्यवहारात गैरप्रकार केल्याचा आरोप केला आहे. मात्र या व्यवहारात एक रुपयाचाही आर्थिक देवाणघेवाण झालेली नाही, असा दावा स्वतः अजित पवारांनी केलाय. तर संबंधित जमिनीबाबत झालेला व्यवहार रद्द करण्यात आला असल्याची माहिती खुद्द अजित पवार यांनी दिली आहे. या प्रकरणात आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आज दमानिया पुण्यातील मुंडवा येथील वादग्रस्त जमिनीची पाहणी करण्यासाठी पोहोचल्या होत्या. परंतु त्यांना त्या ठिकाणी दाखल होण्यापासूनच रोखण्यात आले. यानंतर संतप्त झालेल्या दमानिया यांनी थेट अजित पवारांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तर तसेच उद्या पत्रकार परिषद घेत मोठा गौप्यस्फोट करणार असल्याचं देखील त्यांनी सांगितलं आहे. अंजली दमानिया म्हणाल्या की, मी माहिती घ्यायला जागेवर आले. परवानगी नसेल तर आत सोडता येणार नसल्याचं बोटॅनिकल सर्व्हेचे अधिकारी बोलले. ते उद्धट आहेत. आम्हाला दोन जणांना जाऊ द्या, पाहणी करू द्या, ही परवानगी त्यांनी नाकारली.




# ऑपरेशन लोटसमुळे शिंदे नाराज

## कॅबिनेट बैठकीला शिंदे गटाच्या मंत्र्यांची अचानक दांडी

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून नगरपालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे, राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायत निवडणुकीत काही ठिकाणी महायुती तर काही ठिकाणी स्वबळावर निवडणुका लढत असल्याचं पाहायला मिळालं. मात्र, राज्यातील अनेक नगरपालिकांमध्ये भाजपने शिवसेना शिंदे गटातील उमेदवार आपल्या पक्षात घेत त्यांना उमेदवारी दिली. त्यावरुन भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत राजकीय संग्राम सुरू झाल्याचं दिसून येत आहे. त्यामुळेच, आजच्या कॅबिनेट बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वगळता एकही शिवसेनेचा मंत्री उपस्थित नव्हता. मात्र, यामागे नेमकं कारण काय अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज मंत्रालयात संपन्न झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीवर शिवसेना शिंदे गटाने अघोषित बहिष्कार टाकल्याचे दिसून आले. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी प्रत्येक पक्षाची प्री-कॅबिनेट बैठक होते. शिंदे गटाच्या प्री-कॅबिनेट बैठकीत शिवसेनेचे सगळे मंत्री उपस्थित होते. मात्र, त्यानंतर काहीवेळातच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला यापैकी एकही मंत्री गेला नाही. केवळ एकनाथ शिंदे उपस्थित होते. विशेष म्हणजे कॅबिनेटची बैठक आटोपल्यानंतर शिवसेनेचे सर्व मंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात पोहोचले. या दालनात सध्या देवेंद्र फडणवीस आणि शिवसेनेच्या मंत्र्यांची बैठक सुरु आहे. त्यामुळे, शिवसेना नेते आणि मंत्र्यांच्या नाराजीचं नेमकं कारण काय याची चर्चा होत आहे. त्यानुसार, प्राथमिक माहितीनुसार शिंदेंच्या मंत्र्यांच्या नाराजीची ६ कारणे समोर आली आहेत.

**शिवसेना मंत्र्यांच्या नाराजीची कारणे**

१. भाजप सेनेचे नेते ,नगरसेवक व पदाधिकारी यांचा पक्षप्रवेश आपल्या पक्षात करून घेत आहेत

२. विधानसभेला ज्यांच्या विरोधात निवडणुका लढल्या त्याच उमेदवाराला भाजप आपल्या पक्षात घेत आहे.



३. शिंदेच्या अनेक नेत्यांना किंवा पालकमंत्र्यांना विश्र्वासात न घेता अनेक निर्णय दिले जातात, तसेच निधी देखील वळवला जातो

४. राज्यात सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपकडून युतीचा धर्म पाळला जात नाही.

५. निधी मिळवण्यासाठी देखील शिवसेना आणि शिंदेच्या मंत्र्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

६. संभाजी नगर, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, कोकण या ठिकाणी भाजपने असे प्रवेश करून घेतले जिथे युतीचा धर्म पाळला नाही.

**ठाकरेंच्या उपनेत्या सुषमा अंधारेंची टीका**

हे सर्व विधिलिखीत आहे. ज्याक्षणी एकनाथ शिंदेंनी व्हाया सुरत-गुवाहाटीचा रस्ता पकडला होता. त्याक्षणी भाजप कशा पद्धतीने वापरुन घेईल, हे त्यांच्या कपाळावर लिहून ठेवलेलं होतं. उदय सामंत यांच्यासमोर त्यांनी राणेंचं घर फोडून त्यांनी राणेंसमोर एक आव्हान उभं केलंय. दादा भुसे यांच्यासमोर आता एक अद्वय हिरेंचं आव्हान उभं केलंय. ज्या पद्धतीने शिंदेंच्या आमदारांसमोर भाजप एक-एक आव्हान उभं केलंय. त्यामुळे एकनाथ शिंदेंना आर्श्र्चय वाटायला नको. कारण एकनाथ शिंदेंनी स्वतःला मुख्यमंत्रीपद मिळण्यासाठी या सगळ्यांना राजकीय आत्महत्या करण्यास भाग पाडले, असं सुषमा अंधारे म्हणाल्या. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय समजूत काढतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह इकडे येऊन सांगताय आम्हाला कोणत्याही कुबड्यांची गरज नाही आणि ज्या पद्धतीने एकनाथ शिंदे आणि अजित पवारांच्या मागे भाजपने शुक्लकाष्ट लावलेलं आहे, त्यामुळे कुबड्या म्हणजे एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांना पद्धतशीरपणे बाजूला काढण्याचं काम भाजपकडून करण्यात येत आहे, असा दावाही सुषमा अंधारे यांनी केला.

## परांड्यात तानाजी सावंत आणि राहुल मोटे यांचे गट आमने-सामने, राजकीय वादातून दोन गटात दगडफेक

**मुंबई/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी हालचालीला सुरुवात केली आहे. गाठी भेटी दौरे सुरु केले आहेत. सध्या नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर धाराशीव जिल्ह्यात राजकीय वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. परंडा नगरपरिषदेत आमदार तानाजी सावंत आणि माजी आमदार राहुल मोटे यांचे गट आमने-सामने आले आहेत. परंडा नगरपरिषदेत राजकीय वादातून दोन गटात दगडफेक झाल्याची घटना घडली आहे.

परांडा तालुक्यात शिवसेना आमदार

## शिंदेंच्या शिवसेनेचा पहिला मुस्लिम नगरसेवक विजयी, नाशिक जिल्ह्यात खातं उघडलं

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकच्या नांदगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक आठ 'ब'मधून शिवसेना शिंदे गटाच्या खान जुबेदाबी गफार यांचा एकमेव नामनिर्देशन अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीने नांदगाव नगरपरिषदेत शिवसेनेचा (शिंदे गट ) पहिला उमेदवार बिनविरोध ठरला आणि विजयी झाला.

नांदगाव नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून माजी नगराध्यक्ष राजेश कवडे, अरुण पाटील, माजी नगरसेवक किरण देवरे, सागर हिरे आदींनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून माजी नगराध्यक्ष राजेश बनकर यांना उमेदवारी देत शिवसेना शिंदे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. शिवसेना उबाठा गटाकडून संतोष गुप्ता यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने थेट नगराध्यक्ष पदासाठी मुख्यतः तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. थेट नगराध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत झाल्यास माजी नगराध्यक्ष राजेश कवडे, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार राजेश बनकर यांच्यातच मुख्य लढत होईल. राजेश कवडे सलग दोन टर्म नगराध्यक्ष राहिले आहेत, राजेश बनकरदेखील भारतीय जनता पक्षाकडून थेट नगराध्यक्षपदी निवडून येऊन नगराध्यक्ष राहिलेले आहेत.

# मंत्रिमंडळ बैठकीत ६ धडाकेबाज निर्णय

## मुंबईत परवडणारे घरे उपलब्ध होणार, आयकॉनिक शहर विकासासाठी धोरण जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (१८ नोव्हेंबर) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वाचे सहा निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये बृहन्मुंबई उपनगरातील वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचे धोरण निश्र्चित करण्यात आले आहे.

**आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने घेतलेले महत्वाचे निर्णय:**

१. नगर विकास विभाग-

राज्यातील सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील जमिनी, भुखंडाचा सुयोग्य वापर निश्र्चित करण्यास प्राधान्य. संकल्पना आधारित आयकॉनिक शहर विकासासाठी धोरण जाहीर. सिडकोसह, अन्य प्राधिकरणांना संबंधित संकल्पनांवर आधारित एकात्मिक वसाहती निर्माण करण्याकरिता अधिकार मिळणार. निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय



व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी होणार. सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील लँड बँकेचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी धोरण

२. गृहनिर्माण विभाग-

बृहन्मुंबई उपनगरातील वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचे धोरण निश्र्चित. यातून मुंबई शहर व उपनगर क्षेत्रामध्ये नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध होणार

३. मदत व पुनर्वसन विभाग-

भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेची प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती. यामुळे भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ६४ अन्वये दाखल असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होणार

४. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग-

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता ३३९ पदांची निर्मिती. शिक्षकांची २३२ आणि शिक्षकेतर १०७ पदांना मान्यता

५. महिला व बाल विकास विभाग-

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानहानीकारक शब्द वगळण्यास मान्यता. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधि व न्याय विभागाने केलेल्या शिफारशींनुसार महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ या अधिनियमातील कलम ९ व कलम २६ मधील महारोगाने पिडीत, कुष्टरोगी, कुष्ठालये असे शब्द वगळणार

६. विधि व न्याय विभाग-

महाराष्ट्र सार्वजनिक विश्र्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता.

## कल्याण-डोंबिवलीत रविंद्र चव्हाणांचा सर्जिकल स्ट्राइक! शिंदेंचे खास नगरसेवक थेट भाजपात

**कल्याण-डोंबिवली/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा धुरळा उडाला असून नगर परिषद, नगर पंचायतीच्या निवडणुकीच्या प्रचाराला आजपासून रंग चढणार आहे. तर, दुसरीकडे महापालिका निवडणुकीसाठीदेखील सगळ्याच राजकीय पक्षांनी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. महायुतीमध्येही कुरघोडी सुरू असल्याचे दिसून येत आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी होमग्राउंड असलेल्या कल्याण-डोंबिवलीत शिंदे गटावर सर्जिकल स्ट्राइक केला आहे. चव्हाण यांनी शिंदे कुटुंबीयांचे निकटवर्तीय फोडले असून त्यांना भाजपात प्रवेश दिला आहे.



कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. ठाणे जिल्ह्यातील महापालिकांमध्ये भाजप विरुद्ध शिंदे गट अशी लढत होणार असल्याचे चित्र आहे. त्या पार्श्र्वभूमीवर दोन्ही बाजूने इनकमिंग जोरात सुरू केले आहे. मात्र, अशातच शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे दिवंगत नेते व माजी स्थायी समिती अध्यक्ष वामन म्हात्रे यांचे सुपुत्र अनमोल म्हात्रे यांनी पत्नी अश्विनी म्हात्रेसह भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला आहे. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेशाने स्थानिक राजकारणात खळबळ माजली आहे.भाजपमध्ये प्रवेश करताना अनमोल म्हात्रे यांनी पक्ष नेतृत्वावर विश्वास दाखवत आगामी निवडणुकांमध्ये विजयासाठी काम करण्याची तयारी दर्शवली. त्यांच्या प्रवेशामुळे शिवसेना-शिंदे गटाच्या गोटात नाराजीचे सूर उमटल्याचे बोलले जात आहे.

CMYK

## महान पंतप्रधान इंदिरा गांधी

भारताच्या सर्वात सामर्थ्यशाली पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आज १०८ वि जयंती. इंदिरा गांधींची भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात सामर्थ्यशाली आणि महत्वपुर्ण नेत्यांमध्ये गणना होते. १९ नोव्हेंबर १९१७ रोजी त्यांचा जन्म झाला. इंदिरा गांधी यांना इंदिरा हे नाव आजी आजोबांकडून मिळाले. पण लहानपणी सर्वजण त्यांना प्रियदर्शनी म्हणून बोलवायचे. आई कमला नेहरु आणि वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून त्यांना देशप्रेमाचे बाळकडू मिळाले. लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. कारण त्यांचे पूर्ण कुटुंबच स्वातंत्र्य लढ्यात अग्रणी होते. लहानपणापासूनच स्वदेश आणि स्वदेशी याविषयी त्यांच्या मनात प्रेम निर्माण झाले. अगदी लहान असतानाच त्यांनी विदेशी खेळणी व कपड्यांची होळी केली होती. एका पाहुण्यांनी त्यांच्यासाठी विदेशातून आणलेला किंमती फ्रॉक परिधान करण्यास त्यांनी नकार दिला होता. आजोबा मोतीलाल नेहरू व वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांचे देश स्वातंत्र्य करण्यासाठी चालू असलेले आंदोलने पाहून आपणही या आंदोलनात सहभागी व्हावे असे त्यांना वाटे. वयाच्या अवघ्या १३ वर्षी म्हणजे सण १९३० साली त्यांनी आपल्या सवंगड्यांसह वानरसेना नावाची संघटना स्थापन केली आणि नेत्यांचे संदेश पोहचवण्याचे काम केले. इंग्रजांविरुद्ध मिरवणुका काढल्या, घोषणा दिल्या. त्यांचे सुरवातीचे शिक्षण अलाहाबाद, पुणे इथे झाले पुढे त्या रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन येथे शिक्षण घेण्यासाठी गेल्या. तिथे त्यांनी शिक्षणासोबत विविध कलाही आत्मसात केल्या. वडील पंडित जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्याचा आंदोलनात अग्रणी असल्याने बऱ्याच वेळा ते तुरुंगातच असायचे अशा वेळी इंदिरा याच आई कमला नेहरू यांची काळजी घ्यायच्या. १८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमला नेहरू यांचे निधन झाले तेंव्हा त्यांना खूप दुःख झाले. या दुःखातून सावरण्यासाठी वडील पंडित नेहरू यांनी त्यांना विदेशात शिकण्यासाठी पाठवले. विदेशातून शिक्षण पूर्ण करुन आल्यावर २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी या उमद्या व देखण्या तरुणाशी त्यांनी विवाह केला. विवाहानंतर फिरोज गांधी व इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्याचा चळवळीत भाग घेतला. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर त्या संसारात रमल्या. राजीव आणि संजीव या दोन मुलांच्या पालनपोषणातच त्यांचा वेळ जाऊ लागला. पुढे त्या काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्या. १९५९ साली त्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा बनल्या. यावेळी त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी खूप काम केले. १९६० साली पती फिरोज गांधी तसेच १९६४ साली वडील पंडित नेहरू यांचे निधन झाले तरी त्या खचल्या नाहीत. कठीण परिस्थितीतही त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. लाल बहाद्दूर शास्त्री यांनी त्यांना मंत्रिमंडळात माहिती प्रसारण आणि नभोवाणी खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी दिली त्यांनी ती लीलया पेलली. लाल बहाद्दूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर २४ जानेवारी १९६६ रोजी त्या देशाच्या पंतप्रधान बनल्या. त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली पण त्यावेळी देशाची परिस्थिती खूप बिकट होती. भारत पाकिस्तानचे युद्ध झाले होते. देशात मोठा दुष्काळ पडला होता. अन्नविषयक मदतीचा पी एल ४८० कराराचे नूतनीकरण करण्यास अमेरिकेने नकार दिला होता. या आर्थिक परिस्थितीतुन मार्ग काढत असतानाच १९६७ सलची निवडणूक आली अनेक राज्यात काँग्रेसला पराभव स्वीकारावा लागला. लोकसभेत काँग्रेसचे संख्याबळ घटले. त्यामुळे पक्षातील सिंडिकेट नेत्यांनी उचल खाल्ली. पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपल्या इच्छेप्रमाणे कारभार करावा असे त्यांना वाटत होते. त्यामुळे इंदिरा गांधी आणि त्यांच्यात वाद होऊ लागले त्यातूनच काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. जेष्ठांची सिंडिकेट विरुद्ध तरुणांची इंडिकेट असा उभा संघर्ष झाला. काँग्रेसमधील तरुण नेत्यांनी इंदिरा गांधी यांना साथ दिली. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी सिंडिकेटचे उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांचा पराभव करुन व्ही व्ही गिरी यांना राष्ट्रपती बनवले. सिंडिकेटचा दारुण पराभव झाल्याने इंदिरा गांधी सामर्थ्यवान बनल्या. मंत्रिमंडळात त्यांनी बदल केले. उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखाते त्यांनी स्वतःकडे घेऊन मोरारजी देसाई यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्यानंतर त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, संस्थांनीकांचे तनखे रद्द करणे असे निर्णय घेऊन त्यांनी खळबळ उडवून टाकली त्यांच्या या धाडसी निर्णयाला अनेकांनी विरोध केला पण आपल्या निर्णयापासून त्या तसूभरही मागे हटल्या नाही. १९७१ साली झालेल्या मुदतपूर्व निवडणुका त्यांनी एकहाती जिंकल्या. या निवडणुकीत त्यांनी गरिबी हटाव ही घोषणा दिली. त्यांची ही घोषणा खुप गाजली. गोरगरिबांनी त्यांना भरभरुन मते दिली. याचवेळी पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांच्यात मोठा संघर्ष सुरू झाला. पूर्व पाकिस्तानातून एक कोटी निर्वासित भारतात आले. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण पडला. पूर्व पाकिस्तानला भारत मदत करीत आहे म्हणून पश्चिम पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने भारताला धमकी देत त्यांचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात पाठवले पण त्या घाबरल्या नाहीत त्यांनी जनतेला आणि सैनिकांना विश्वास दिला या विश्वासाच्या जोरावरच भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला आणि बांगलादेश नावाचे नवे राष्ट्र उदयास आणले. पाकिस्तानचे एक कोटी सैनिक भारताला शरण आले. यावेळी त्यांनी दाखवलेल्या धाडसाची आणि नेतृत्वगुणाची जगाने दखल घेतली. जागतिक राजकारणातील एक सामर्थ्यशाली नेत्या म्हणून त्या उदयास आल्या. देशातही त्यांची लोकप्रियता शिखरास पोहचली. विरोधी पक्षनेते अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गेची उपमा दिली. १९७५ साली त्यांनी सिक्कीमचे भारतात विलीनीकरण केले तर १९७६ साली अणुस्फोट करुन देशाला अणुऊर्जेत स्वयंपूर्ण बनवले. २६ जून १९७५ रोजी त्यांनी देशावर लादलेली आणीबाणी मात्र लोकांना रुचली नाही त्यामुळे १९७७ साली झालेल्या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला पण तीन वर्षाने १९८० साली त्या बहुमताने विजयी झाल्या. १९८४ साली पंजाबमधील पवित्र सुवर्ण मंदिरात खलिस्तानवादी अतिरेकी ठाण मांडून बसले होते. देशाची दुसरी फाळणी करुन स्वतंत्र खलिस्तान देश निर्माण करणे ही त्यांची मागणी होती त्यांचा जर लवकर बिमोड केला नाही तर देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला मोठा धोका आहे हे ओळखून या अतिरेक्यांना सुवर्ण मंदिरातून हुसकावून लावण्यासाठी ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. हा निर्णय घेऊ नये असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला. या मोहिमेमुळे अतिरेकी त्यांचा जीव घेण्यासही मागे पुढे पाहणार नाहीत असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला पण देशाच्या अखंडतेसाठी त्यांनी हा निर्णय घेतला. सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबवून अतिरेक्यांना बाहेर काढण्यात आले. अनेक अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला. भिंद्रनवाले हा अतिरेकी या कारवाईत मारला गेला. या मोहिमेने दुखावलेल्या त्यांच्या अंग रक्षकानींच ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्यावर गोळीबार केला त्यात त्यांचा दुःखद अंत झाला. त्यांच्या मृत्यूने भारतातच नव्हे जगात शोककळा पसरली. देशाच्या सार्वभौमत्व आणि

# सारंगधर बालाजी दर्शन व महामानवांना अभिवादन करून किशोरभाऊ गारोळेंच्या प्रचाराला मंगल सुरुवात

## जनसागर, तरुणांचा उत्साह आणि २६ उमेदवारांची एकजूट मेहकरात शिवसेनामय







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शहरातील सारंगधर बालाजी मंदिर परिसरात आज अभूतपूर्व वातावरण पाहायला मिळाले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार किशोर भाऊ गारोळे यांच्या प्रचाराला आज भव्य, ऊर्जायुक्त आणि उत्साहवर्धक सुरुवात झाली. पहिल्या दिवशीच मेहकर शहरात उसळलेल्या जनसागराने आणि तरुणांच्या प्रचंड प्रतिसादाने संपूर्ण वातावरणात निवडणूक सरगर्मी जाणवली. नगरसेवकांची एकजूटएकाचवेळी नारळ फोडून प्रचाराला शुभारंभ शहरातील आराध्य दैवत सारंगधर बालाजी मंदिर येथे सर्व २६ प्रभागांतील २६ नगरसेवक उमेदवार एकत्र आले आणि एकाचवेळी नारळ फोडून प्रचाराला शुभारंभ केला.

परंपरेनुसार पहिला नारळ उमेदवार किशोर गारोळे यांचे वडील भास्करराव गारोळे यांच्या हस्ते फोडण्यात आला. त्यानंतर सर्व उमेदवारांनी एकत्र नारळ फोडून मेहकरातील एकजूट आणि संघटनेची ताकद सर्वांसमोर प्रकट केली.

**किशोर भाऊ गारोळेमेहकरच्या तरुणाईचे खरे 'भाऊ'**

पहिल्याच दिवशी उमटलेला प्रचंड प्रतिसाद पाहता किशोर भाऊ गारोळे यांना शहरातील युवकांनी दिलेला विश्वास आणि साद स्पष्ट जाणवत होती. त्यांच्या सभोवताली उभा ठाकलेला उगवत्या मतदारांचा महासागर त्यांच्या नेतृत्वावरची छाप अधोरेखित करत होता. मेहकरचे ''भाऊ'' म्हणून ओळख निर्माण झाल्याचे आजच्या वातावरणाने अधिक पक्के केले.

**सर्व धर्मीय समभावाचा अनोखा संदेश**

किशोर गारोळे यांनी प्रचार प्रारंभानंतर शहरातील महामानवांना अभिवादन केले आणि हजरत पाच पीर बाबा दर्गा येथे चादर चढवून सर्व धर्मीय समभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. यामुळे प्रचाराचा सूर फक्त राजकीय न राहता सामाजिक एकतेकडे झुकलेला दिसला.

**जनसागर, महिला–युवकांचा उत्साह आणि शिवसैनिकांचा जोश मेहकरात नवा माहोल**

बालाजी मंदिर परिसर संध्याकाळी गजबजला होता. शिवसैनिक, महिला, युवक आणि सर्व समाजांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरात ''गारोळे–गारोळे'' अशा घोषणा दुमदुमत होत्या. वातावरणात विजयी जोश आणि संघटनेची ताकद प्रकर्षाने जाणवत होती.

**आमदार सिद्धार्थ खरात यांची ठाम प्रतिक्रिया**

कार्यक्रमाला उपस्थित असलेले आमदार सिद्धार्थ खरात यांनी मेहकरातील वातावरण पाहून प्रतिक्रिया देताना म्हटले की ''हा प्रतिसाद अभूतपूर्व आहे. ही सीट महाराष्ट्रात रेकॉर्ड ब्रेक मताधिक्याने जिंकणार आहे.'' तसेच, ''किशोर गारोळे हे युवकांच्या काळातील ताईत नेतृत्त्व आहे,'' अशा शब्दांत त्यांनी गारोळेंचे कौतुक केले.

महत्त्वाची मान्यवर उपस्थिती या भव्य प्रचार प्रारंभ कार्यक्रमाला धर्मवीर पुत्र प्रा.आशिष राहते निंबाजीपांडवअॅडआकाशगोडेविलास चनखोरे अॅड संदीप गवई ताजने सर महेश रिंढे तसेच सर्व २६ प्रभागांतील नगरसेवक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आगामी निवडणुकीत मेहकरात रंगणार मोठी चुरस

प्रचाराच्या पहिल्याच दिवशी उमटलेली गर्दी, युवकांची लाट, उमेदवारांची एकजूट आणि गारोळे यांच्या नेतृत्वावरचा प्रचंड विश्वास पाहता आगामी निवडणुकीत मेहकरात मोठी चुरस निर्माण होणार हे स्पष्ट दिसू लागले आहे. पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद; धम्म प्रसाराची दिशादर्शक सुरुवात

**लातूर/प्रतिनिधी :** त्रिरत्नांचा संदेश घराघरांत पोहोचवण्यासाठी निरंतर कार्यरत असलेल्या बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर आणि समस्त लातूरकरांच्या सहकार्याने पु. भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शना खाली आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद रामेगाव, बार्शी रोड येथील महाविहार धम्म संस्कार केंद्रात २५ डिसेंबर २०२५ रोजी भव्य स्वरूपात होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून धम्मक्रांती, मानवता, बंधुता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वप्नात पाहिलेले बौद्धमय भारताचे दृश्य अधिक प्रभावीपणे समाजासमोर मांडले जाणार आहे, असे परिषदेचे मुख्य संयोजक पु.भिक्खू पय्यानंद थेरो यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या पत्रकार परिषदेला भंते बोधिराज, प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, केशव कांबळे, डॉ. सुधाकर गुळवे, डी. एस. नरसिंगे, एम. एन. गायकवाड, पांडुरंग अंबुलगेकर, देवदत्त सावंत, प्राचार्य. डॉ. दुश्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, अंतेश्वर थोटे, प्रा. यु. डी. गायकवाड, बसवंतप्पा उबाळे, करण ओव्हाळ, उदय सोनवणे, ॲड. आनंद सोनवणे, प्रा. कल्याण कांबळे, व्ही. आर. बोरीकर, गौतम सूर्यवंशी, मिलिंद धावारे, सुजाता अजनिकर ई. सह मोठ्या संख्येने उपासक उपासिकांची उपस्थिती होती. आठव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे उद्घाटन पु. भिक्खू करूणानंद महाथेरो, संघनायक (दिल्ली) यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान अ.भा. भिक्खू संघ शाखा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष भिक्खू धम्मसेवक महाथेरो (मूळावा) भूषवणार आहेत. याच प्रसंगी प्रतिष्ठेच्या सातकर्णी स्मरणिकेचे प्रकाशन पु.भिक्खू प्रा. डॉ. खेमधम्मो महाथेरो यांच्या हस्ते होणार आहे.

२५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळची सुरुवात धम्ममय वातावरणात होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून सकाळी ०८:०० वाजता पंचरंगी धम्मध्वजारोहणा नंतर उपासक–उपासिकांच्या भव्य उपस्थितीत धम्म मिरवणूक निघणार आहे. अण्णाभाऊ साठे चौक, गंजगोलाई, बसस्टँड मार्गे जात ही मिरवणूक आंबेडकर पार्क येथे समारोप पावेल. यानंतर सकाळी १०:०० वाजता मुख्य धम्मध्वजारोहण भिक्खू शरणानंद महाथेरो, पाथरी यांच्या हस्ते विधिपूर्वक करण्यात येईल.

या वर्षीच्या परिषदेत देशभरातील तसेच परदेशातील अनेक नामवंत भिक्खू सहभागी होत असून त्यांच्या धम्म देशनेमुळे ज्ञान, प्रेरणा आणि चिंतनाचा समृद्ध अनुभव मिळणार आहे. यावेळी भिक्खू प्रा. डॉ. सत्यपाल महाथेरो (छ. संभाजीनगर), भिक्खू दयानंद महाथेरो (मूळावा), भिक्खू डॉ. यशकाश्यपायन महाथेरो (जयसिंगपूर), भिक्खू पय्यातीस्स महाथेरो (शिरसाळा), भिक्खू धम्मानंद महाथेरो (अंदूर–बिदर) तसेच अनेक वरिष्ठ भिक्खूगणांचा समावेश असेल. हजारो उपासक–उपासिका आणि धम्मप्रेमी या परिषदेत सहभागी होणार असल्याने लातूर नगरी पुन्हा एकदा धम्ममय होणार आहे. लातूर जिल्हा धम्म प्रचारातील अग्रणी केंद्र मानला जातो. तेर (तगर) नगरी, खरोसा लेणी यांसारखी बौद्धकालीन प्राचीन स्थळे या परंपरेचा वारसा जपतात. पु.भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली उभे राहिलेले महाविहार धम्म संस्कार केंद्र हे आज राज्यातील धम्म शिक्षणाचे प्रभावी केंद्र आहे. २०१७ पासून आजपर्यंत सात परिषदा यशस्वीरीत्या आयोजित करून लातूरने धम्म प्रचारात एक मोलाची परंपरा निर्माण केली आहे. सर्व धम्म प्रेमींना पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या वेळी केले आहे. लातूर, मराठवाडा आणि महाराष्ट्रातून हजारो उपासक उपस्थित राहणार आहेत.

हंगामी नियोजन कार्यकारिणीमध्ये मार्गदर्शक : पू. भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो, अध्यक्ष / मुख्य संयोजक : भिक्खू पय्यानंद थेरो, उपाध्यक्ष : डॉ. सदानंद कांबळे, इंजि. सचिन गायकवाड व इतर, सचिव : प्रा. देवदत्त सावंत, कोषाध्यक्ष : डॉ. अरुण कांबळे, स्मरणिका प्रकाशन : प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे, मिलिंद धावारे यांचा समावेश आहे. लातूरमध्ये होणारी आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून धम्म, बंधुता आणि मानवतावादाच्या नव्या युगाची सुरूवात आहे.

# कृत्रिमरित्या फळे-पिकविण्यावर निर्बंध; नियमबाह्य पद्धतींवर कारवाई करण्यात येणार अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

## फळे पिकविण्याच्या शास्त्रीय पद्धतींबाबत जनजागृती करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिमरित्या फळे व भाज्या पिकविण्यासाठी नियमबाह्य पद्धतींचा वापर होऊ नये यासाठी तपासणी करण्यात यावी तसेच अवैध प्रकारांवर कारवाई करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.



यासंदर्भात सहकार व पणन विभागाच्या अखत्यारीतील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आणि त्यांच्या अंतर्गत असलेल्या फळ व्यापाऱ्यांना फळे पिकविण्याच्या शास्त्रीय पद्धतींबाबत कार्यशाळांद्वारे मार्गदर्शन व जनजागृती करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांनी दिले.

मंत्रालयात सहकार, पणन आणि अन्न औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी विभागाचे आयुक्त श्रीधर डुबे–पाटील, सहसचिव रा. को. धनावडे, सहआयुक्त मंगेश माने, तसेच सहकार व पणन विभागाच्या उपसचिव माधवी शिंदे उपस्थित होत्या.

बेकायदेशीर रसायने किंवा गॅस वापरून फळे कृत्रिमरीत्या पिकविण्याचे प्रकार आढळल्यास अन्न सुरक्षा मानके कायदा (एफएसएसएआय) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येत आहे. एप्रिल २०२४ ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान आंबा, केळी आणि इतर फळांचे एकूण १२८ नमुने तपासणीसाठी घेतले असून त्यापैकी १०४ नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. २४ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत, अशी माहिती बैठकीत विभागाकडून देण्यात आली,



अन्न सुरक्षा मानके नियम २०११ मधील नियमन २.३.५ नुसार फळे कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी कार्बाईड गॅसचा वापर पूर्णपणे प्रतिबंधित आहे. ऑगस्ट २०१६ मधील दुरुस्तीनुसार १०० पीपीएम तीव्रतेपर्यंत इथिलिन गॅसचा वापर करण्यास मर्यादित परवानगी देण्यात आली आहे.

यावेळी विभागाचे सहायक आयुक्त महाले, कक्ष अधिकारी अजित जगताप उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राष्ट्रपतींच्या हस्ते सहावे 'राष्ट्रीय जल पुरस्कार' प्रदान

## महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट राज्य' पुरस्कार; नवी मुंबई मनपासह नाशिकच्या कानिफनाथ जलवापर संस्थेचाही सन्मान

दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय जलशक्ती मंत्रालयामार्फत जलव्यवस्थापन आणि संवर्धन क्षेत्रातील कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये (२०२४) महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्याचा पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्याच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. तसेच उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबई महापालिकेला प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात झालेल्या सोहळ्यात राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय जल पुरस्कार - २०२४ प्रदान करण्यात आले. यावेळी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, जलशक्ती राज्यमंत्री राजभूषण चौधरी, राज्यमंत्री व्ही. सोमन्ना, विभागीय सचिव व्ही. एल. कांथाराव व विभागाचे सचिव अशोक, के. के. मीना यावेळी उपस्थित होते. मंत्री विखे पाटील यांच्यासोबत राज्याच्या जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर उपस्थित होते.




या मानांकन स्पर्धेत गुजरातला दुसरा तर हरियाणाला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**राष्ट्रपतींकडून विजेत्यांचे अभिनंदन**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी, आपल्या भाषणात, अमृता इतक्याच मौल्यवान असलेल्या जल संसाधनाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्वांचे कौतुक केले. भारतीय परंपरेमधे जलस्रोतांना पूजनीय मानले गेले आहे. पाण्याच्या संवर्धनासाठी काम करणारे कौतुकास पात्र आहेत, असे यावेळी राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्यावर्षी सुरू झालेल्या जलसंवर्धन जनसहभाग उपक्रमाद्वारे ३५ लाखांहून अधिक भूजल पुनर्भरण संरचना उभारल्या गेल्या असे राष्ट्रपतींनी यावेळी सांगितले. देशात मर्यादित जलस्रोत असल्याने त्याचा वापर जपून करायला हवा आहे. हवामान बदलाचा जलस्रोतांवर परिणाम होत असून जलस्रोतांच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट राज्य' पुरस्कार अभिमानाची बाब**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र सदन येथे माध्यमांशी संवाद साधताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट राज्य' म्हणून सन्मान प्राप्त होणे ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. राज्य शासनाने राबवलेल्या अभिनव जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, पाणी वापर संस्था तसेच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय आहे.

बंद नलिका वितरण प्रणाली, उपसा सिंचन प्रकल्पांचे आधुनिकीकरण, नदी जोड प्रकल्प, पम्पिंग स्टोरेज योजना, जलाशयांवर फ्लोटिंग सौर प्रकल्प आणि सांडपाणी शुद्धीकरण-पुनर्वापर या सहा अभिनव संकल्पनांमुळे महाराष्ट्राला हे यश मिळाल्याचे मंत्री विखे-पाटील यांनी नमूद केले. महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रमुख यशासोबतच महाराष्ट्रातील इतर दोन संस्थांनाही महत्त्वाच्या श्रेणींमध्ये पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था या गटात नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकावला. हा पुरस्कार आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वीकारला. सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्था नाशिक जिल्ह्यातील कनिफनाथ जल/पाणी वापर सहकारी संस्थेला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष आणि इतर पदाधिकारी यांनी स्वीकारला.

## भारत - पाकिस्तानच्या खेळाडूंनी अखेर हात मिळवले, हँडशेक प्रकरणात मोठा ट्विस्ट

दैनिक आपला विदर्भ

**दिल्ली/वृत्तसंस्था :** आशिया कप २०२५ पुरुष स्पर्धेत टीम इंडियाने तब्बल तीन वेळा पाकिस्तान संघाचा दारुण पराभव केला. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सामना संपल्यावर खेळाडूंनी एकमेकांशी हात मिळवला नाही. कर्णधार सूर्यकुमार यादव आणि त्याच्या संघाने घेतलेली ही भूमिका पाकिस्तानला खूप झोंबली. पण अनेक भारतीय यावेळी टीम इंडियाच्या पाठीशी उभे राहिले. आशिया कप २०२५ मध्ये सुरु झालेल्या या हॅन्डशेक वादात आता नवा ट्विस्ट आलाय. रविवारी १६ नोव्हेंबर रोजी भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात सामना खेळवला गेला. मात्र या सामन्यात जे घडलं ते पाहून सर्वच हैराण झाले. श्रीलंकेत दृष्टीहीन महिलांच्या टी२० स्पर्धेत रविवारी भारताचा सामना पाकिस्तानशी होता. भारतीय पुरुष संघाप्रमाणेच भारताचा महिला संघ सुद्धा पाकिस्तानच्या खेळाडूंशी हात मिळवणार नाही. टॉस दरम्यान भारताच्या कर्णधाराने पाकिस्तानच्या कर्णधाराशी हात मिळवला नाही. पण सामना संपल्यावर दोन्ही संघाच्या खेळाडूंनी एकमेकांशी हात मिळवला. जे पाहून सर्वच हैराण झाले. मीडिया रिपोर्ट्सनुसार भारत-पाकिस्तान ब्लाइंड महिला संघातील सर्व खेळाडू या सामन्यापूर्वी एकाच बसमध्ये बसून स्टेडियमसाठी रवाना झाले. सामन्यानंतर जेव्हा दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकमेकांशी हात मिळवला तेव्हा फॅन्स आश्चर्यचकित झाले. सध्या या घटनेचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होतोय. यावर लोकांनी वेगवेगळ्या रिऍक्शन दिल्या. काहींनी याला 'स्पिरिट ऑफ द गेम' असे म्हटले, तर काहींनी प्रश्न उपस्थित केले. बीसीसीआयने याबाबत अद्याप कोणतेही वक्तव्य केलेले नाही. हॅन्डशेक वाद बाजूला ठेवला, तर भारताच्या अंध महिला क्रिकेट संघाने पाकिस्तानच्या संघावर ८ विकेटने विजय मिळवला. कटुनायके येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात, पाकिस्तानच्या अंध महिला संघाने प्रथम फलंदाजी करताना स्कोअरबोर्डवर १३५ धावा केल्या. टीम इंडियाने हे लक्ष्य फक्त १०.२ ओव्हरमध्ये पूर्ण केलं आणि फक्त दोन विकेट गमावल्या.

## हादरवणारी बातमी! आत्मघातकी बनणार... मरणार...; दिल्ली ब्लास्ट आधीचा दहशतवादी उमरचा खळबळजनक व्हिडीओ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या आत्मघातकी स्फोटानंतर या स्फोटाची पाळंमुळं शोधण्यासाठी संरक्षण आणि तपास यंत्रणांनी देश पिंजून काढला. दहशतवादाचं हे जाळं नेमकं कुठवर पसरलं आहे याचा तपास घेतानाच काही धक्कादायक गोष्टी समोर आल्या आणि काही कट्टरतावादी अनब स्फोटातील दोषींवर तातडीनं अटकेची कारवाईसुद्धा झाली. याच स्फोटातील आत्मघाती हल्लेखोर डॉ. उमर याचा एक व्हिडीओ समोर आला आहे. हा व्हिडीओ दिल्ली स्फोटाआधीचा असल्याचं सांगण्यात येत आहे.



दहशतवादी डॉ. उमर याच्या या व्हिडीओमध्ये तो आपण आत्मघाती होणार असल्याचं बोलताना दिसत आहे. दिल्लीमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील मुख्य आरोपी असणाऱ्या उमरचा हा व्हिडीओ स्फोटाआधीचा असून खुद्द उमरनंच रेकॉर्ड केल्याचं सांगण्यात येत असून, त्यात त्यानं आपण आत्मघाती हल्ला करणार असल्याचंही म्हटलं आहे. विविध तपासयंत्रणा या स्फोटानंतर दहशतवाद्यांचा मागोवा घेतला. ज्यादरम्यान हा व्हिडीओ समोर आला आहे. डॉ. उमरनं त्याचे मनसुबे या व्हिडीओमध्ये बोलून दाखवले असून, आत्मघाती हल्ल्याचाच उल्लेख तो करताना दिसत आहे.

## धनुषच्या मॅनेजरवर तमिळ अभिनेत्रीचा गंभीर आरोप: म्हणाली- काम देण्याच्या बहाण्याने कास्टिंग काउचचा प्रयत्न केला, म्हणाला की ॲडजस्टमेंट करावे लागेल

**मुंबई/प्रतिनिधी :** तमिळ टीव्ही अभिनेत्री मान्या आनंदने दावा केला आहे की, साऊथ सुपरस्टार धनुषचा मॅनेजर असल्याचा दावा करणाऱ्या श्रेयस नावाच्या एका व्यक्तीने तिला कास्ट काउच करण्याचा प्रयत्न केला. अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत मान्याने सांगितले की, श्रेयस तिच्याशी ॲडजस्टमेंट करण्यासाठी बऱ्याच काळापासून वाटाघाटी करत होता आणि काम देण्याच्या नावाखाली तो अनुचित मागण्याही करत होता.

तमिळ वेबसाइट सिनेउलगमला दिलेल्या मुलाखतीत, अभिनेत्रीने श्रेयसने तिच्याशी आणि इतर कलाकारांशी संपर्क साधला आणि धनुष अभिनीत एका नवीन चित्रपट प्रकल्पात त्यांना भूमिका देऊ केल्याचे सविस्तर सांगितले. मुलाखतीदरम्यान, श्रेयसने अशा मागण्या केल्या ज्या तिला आक्षेपार्ह वाटल्या. मान्या आठवण काढत म्हणते की श्रेयसने तिला सांगितले की ही एक जुळवून घेण्याची आणि वचनबद्धतेची भावना आहे. यावर तिने विचारले, ''कसली वचनबद्धता? मला ॲडजस्टमेंट का करावी लागते?''

मान्या म्हणते, ''मी त्यांना आधीच स्पष्ट केले होते की मला अशी कोणतीही ऑफर स्वीकारायची नाही, पण श्रेयस आग्रह करत राहिला. तो म्हणाला, धनुष सर असले तरी तुम्ही सहमत होणार नाही का?'' शिवाय, मान्याने दावा केला की श्रेयसने तिला धनुषच्या प्रॉडक्शन हाऊस, वंडरबार फिल्म्सचे लोकेशन पाठवले आणि तिला भेटण्यास सांगितले. तिने असेही म्हटले की, त्याने तिला स्क्रिप्ट पाठवली होती, जी तिने वाचली नव्हती.

इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, मान्या म्हणाली, ''मी ते वाचले नाही. मी हा चित्रपट करत नाहीये. आम्ही कलाकार आहोत. आम्ही काहीतरी वेगळं करत आहोत. तुम्ही आम्हाला कामावर ठेवता, पण त्या बदल्यात तुम्हाला काहीही अपेक्षा नाही.''''जर आम्ही तुमची मागणी मान्य केली असती तर आमचे नाव काहीतरी वेगळे असते. मला वाटते की लोकांनी ही प्रवृत्ती ओळखली असती आणि ती हाताळली असती तर ते बरे झाले असते.''

## १ कोटींचा इनामी माओवादी हिडमा अखेर ठार; सीमेवर भीषण चकमक

**रायपूर/वृत्तसंस्था:** कुख्यात माओवादी कमांडर मडवी हिडमा अखेर सुरक्षा दलांच्या जाळ्यात सापडला. आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्यात सोमवारी झालेल्या तीव्र चकमकीत हिडमा ठार झाल्याची महत्त्वाची माहिती समोर आली आहे.सुरक्षा दलांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, आंध्र प्रदेश-छत्तीसगड-तेलंगणा या तीन राज्यांच्या संगमावर असलेल्या घनदाट जंगल परिसरात संयुक्त दलांनी पहाटेपासून शोधमोहीम सुरू केली होती. या भागात माओवादी तळांची संख्या मोठी असून, सुरक्षा दलांच्या हालचालींवर लक्ष ठेवून नक्षलवादी अनेकदा अचानक हल्ले होत होते. शोधमोहीम अधिक खोलवर गेल्यानंतर माओवादी संघटना आणि सुरक्षा दलांमध्ये गोळीबार सुरू झाला. काही वेळ चाललेल्या या चकमकीत किमान सहा माओवादी ठार झाले असून, त्यात हिडमा व त्याची पत्नी राजे उर्फ राजक्का यांचा समावेश असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. परिसरात अजूनही शोधमोहीम सुरू असून, जंगलात अनेक गुहा आणि दऱ्यांमध्ये इतर माओवादी लपले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यस्तरीय यशवंत-वेणू सन्मान गौरव पुरस्कार वितरण सोहळा

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी:** पुणे येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी कृषी, शैक्षणिक, सहकार, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील महान व्यक्तिमत्त्वांना त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार दिले जातात. यामध्ये आतापर्यंत राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सामाजिक कार्यकर्ते मोहन धारिया, दिलीप वळसे पाटील, डॉ. पी.डी.पाटील, यशवंतराव गडाख, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, पोपटराव पवार, ज्येष्ठ साहित्यिक रामदास फुटाणे, ना.धो.महानोर, विठ्ठल वाघ, रावसाहेब शिंदे, बाळासाहेब विखे पाटील, चंद्रकांत दळवी, श्रीनिवास पाटील, उल्हासदादा पवार अशा महान व्यक्तिंना देण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर यंदाही या ऐतिहासिक पुरस्काराची घोषणा यंशवतराव प्रतिष्ठानचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी केली असून यावर्षीचा यशवंत-वेणू राज्यस्तरीय सन्मान गौरव पुरस्कार भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर यांना जाहीर करण्यात आला असून या पुरस्काराचे वितरण २७ नोव्हेंबर २०२५ रोजी गुरूवारी दुपारी ०३.३० वा मुंबई पुणे रस्ता, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ येथील सायन्स पार्क समोरील ॲटो क्लस्टर सभागृहामध्ये करण्यात येणार आहे.

यशवंत-वेणू पुरस्कार वितरण सोहळा अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबणीस यांच्या शुभहस्ते पार पडणार आहे. या कार्यक्रमाला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे माजी कुलगुरू डॉ.पंडित विद्यासागर, मराठवाडा मित्रमंडळाचे अध्यक्ष अरुण पवार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड विभागाचे अध्यक्ष पुरूषोत्तम सदाफुले पाटील, उपाध्यक्ष अरून गराडे, कार्यकारी अध्यक्ष रंगनाथ गोडगे पाटील, निमंत्रक कैलास आवटे, सचिव जयवंत भोसले, प्रसिध्द प्रमुख हणुमंत देशमुख, संपर्क प्रमुख बाजीराव सातपुते आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आलेले आहे.

## शब्दकोडे क्र. 13



आडवे शब्द

१. अत्यंत नीच, दुष्ट ४. मंत्रीमंडळ ७. बांगड्यांचा व्यवसाय करणारी एक जमात १०. बायको ११. झकास, छान १२. लाकूड कापण्याचे दातेरी हत्यार १४. एकूण एक सर्व १५. घटस्फोट १६. प्रतिष्ठा, समाजातील वजन १७. लोणी २०. मिंधा २२. लहान मुलगी, कुमारी २३. धनी, स्वामी २५. केळ्यांचा गुच्छ २६. अग्रलेख २८. नृत्यकलेचा देव ३०. बगळा ३२. जरचा जोडीदार ३३. देवाशी केलेला करार ३४. तालासुरात बांधलेले ३५. परमेश्वर ३७. वाणी ३९. मनाचा ओढा ४२. दुलई ४३. पत्त्यातील जोडपे ४४. मराठीत कोर्ट ४५. खून ४६. एक ज्वालाग्रही खनिज ४८. स्वयंप्रकाशी कीटक ४९. फुललेला, फुगीर ५१. जागणे, देवाच्या नावाने जागरण करणे ५२. वेल ५४. डोंगर ५६. दचकणे, घाबरणे ५८. मोठ्या मनाचा ५९. संधी, फुरसत ६०. असंख्य, पुष्कळ ६२. जन्म-मृत्यू ६४. जिवलग मित्र ६७. धमनी, रक्तवाहिनी ६८. रसाळ ६९. नमनीय ७२. कंटाळवाणी (बडबड) ७४. भात शिजतानाचा आवाज ७६. त्वरित, अचानक ७७. प्रत्येक दिवशी ७८. वाळवी, उणीव

उभे शब्द

१. फार मोठे २. योग्य, उचित ३. दहावी रास ४. नवऱ्याची दुसरी पत्नी ५. मिग्नन ६. प्रजा ७. पूर्ण बदल ८. प्रामाणिक, सज्जन ९. रत्न १०. विद्युल्लता १३. दागदागिने १५. पुष्कळ, अति १६. पळून जाणे १८. रंग १९. थेट, सरळ २१. जाणीव, लाज २२. शिल्लक राहिलेली रक्कम २३. मानलेली मुलगी २४. महाभयंकर २७. दार २९. विजयाचा नामघोष ३०. बांधलेला ३१. पं.भीमसेन जोशी यांचे गुरु ३६. जमीन मोजण्याची पट्टी ३८. गवत ४०. नाश पावणे (वा.प्र.) ४१. वडीलांची बहीण ४३. कणखर, ओबडधोबड ४५. पोलीस शिपाई ४७. आजूबाजूला ५०. वळू ५३. धातूचा धागा ५४. एक केशरी गराचे फळ ५५. मुलायम ५६. चविष्ट ५७. मागील अंगणाचा दरवाजा ५८. पार्वतीचे एक नाव ६१. फुलपाखराची प्रथमावस्था ६२. लोकांचा कल ६३. सामुदायिक रडणे ६५. पदार्थातील अतिमीठाची चव ६६. चरण ७०. रूचिहीन ७१. संधी ७३. दगडवरील घाव, पाणी साठवण्याचे साधन ७५. सडक,मार्ग

### शब्दकोडे क्र. 12 चे उत्तर

आडवे उत्तर

१.मैफल ३.कसई ५.रामभरोसे ६अ.ताप ८.वनराज ९.बाग १०.कुसळ ११.नरक १३.मरातब १५.बातमीदार १७.सरबत १९.हतबल २१.सणवार २३.कोना २४.देह २५.चकमक २८.आवाज ३०.याचक ३१.धडक ३३.वग ३५.नाराज ३७.मदत ३८.माकड ३९.साम ४०.सतावणे ४१.करपाशी ४३.कसा ४६.गमला ४८.सडाफटिंग ४९.पलायन ५१.नग ५२.पत्ता कट ५३.तरबेज ५६.तरट ५८.सुमन ५९.मटका ६०.शनिवार ६२.साधना ६४.तरुणाई ६५.रकमपात ६६.राम ६७.सपना ६८.घर ७०.धस ७२.कारभार ७५.ठोंब्या ७६.गपकन ७७.फूस ७८.कुंतल ७९.तारा

उभे उत्तर

१.मैदान २.लवकर ३.करामत ४.साजरा ५.राग ६.भरात ६अ.तास ७.पळभर ९.बाबत १०.कुरण १२.रसना १४.तहहयात १५.बालक १६.दास १८.बाटवा २०.बचकभर २२.वाणवसा २३.महिना २६.मधमाशी २७.कडक २८.आजतगाजत २९.जमणे ३२.कडकडाट ३४.गमनागमन ३६.रास ४१.कलागत ४२.पाचपट ४४.साफ ४५.फापटपसारा ४७.मन ४८.सकटनिकट ५०.नरम ५४.बेट ५५.जकातनाका ५७.रसोईघर ५८.सुरपारंबी ६०.शर ६१.वाम ६३.धपधप ६७.सबब ६९.गोबरा ७१.सक ७३.रफू ७४.भास ७४अ.छत

# मूल्यवर्धन तालुकास्तरीय/केंद्रस्तरीय शिक्षक प्रशिक्षण आदिवासी आश्रम शाळेत संपन्न

## शिक्षक मूल्यवर्धन प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/ प्रतिनिधी:** आदिवासी आश्रम शाळा ढाणकी येथे मूल्यवर्धन अंतर्गत तालुकास्तरीय व केंद्रस्तरीय शिक्षक प्रशिक्षण उत्साहात संपन्न झाले. जिल्हा परिषद, नगर परिषद व खाजगी अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीतील शिक्षकांनी या प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सदरील प्रशिक्षणात श्री. विजय बेतेवाड, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती उमरखेड यांनी अध्यापन पद्धती, विद्यार्थीकेंद्री शिक्षण व मूल्यवर्धन उपक्रमांवर मोलाचे मार्गदर्शन केले.



प्रशिक्षणासाठी श्री संतोष घुगे केंद्रप्रमुख चिखली, श्रीआनंद देशमुख केंद्रप्रमुख ब्राह्मणगाव, श्री. विजय चौधरी केंद्रप्रमुख बिटरगाव, श्री. आनंद कुंभरवार केंद्रप्रमुख ढाणकी, श्री. संतोष कांबळे केंद्रप्रमुख जेवली उपस्थित होते.

प्रशिक्षणाचे जिल्हा सुलभक श्री. रवींद्र चव्हाण, तालुका समन्वयक श्री. शिवाजी सावळे तसेच प्रशिक्षण सुलभक श्री. अवित कुमार राठोड, श्री. रामदास शेळके, श्री. अक्षय नवरे, श्री. परमेश्वर घुसे, श्री. लक्ष्मण बंडीवार, श्री. सतीश बनसोडे, श्री. संजय बरगे, श्री. गजानन माने, श्रीनिवास मोरे, श्री. प्रवीण जगडमवार, श्री. शशांक पाचकोर यांनी विविध शैक्षणिक विषयांवर प्रभावी मार्गदर्शन केले.

उपस्थित शिक्षकांनी प्रशिक्षणाबद्दल समाधान व्यक्त करत अशा प्रशिक्षणामुळे अध्यापन अधिक परिणामकारक होत असल्याचे मत व्यक्त केले.

वृत्तविशेष...

### आधी अनगरमध्ये बिनविरोध १७, आता जळगावमध्येही कमळ खुलले; ३ जागांवर भाजपचे उमेदवार जिंकले

**दैनिक आपला विदर्भ**

जळगाव,१८ नोव्हेंबर (पीएसआय)

जळगाव जिल्ह्यात महाविकास आघाडीला जोरदार धक्का बसला आहे. जिल्ह्यातील सावदा, भुसावळ, आणि जामनेर या ठिकाणी भाजपचे तीन नगरसेवक बिनविरोध विजयी झाले आहेत. भुसावळ मध्ये भाजपच्या उमेदवार प्रीती मुकेश पाटील बिनविरोध विजयी झाल्या आहेत. तर सावदामध्ये रंजना भारंबे आणि जामनेर मध्ये उज्वला तायडे या बिनविरोध निवडून आल्या आहेत.

सावदा, भुसावळ, आणि जामनेर या ठिकाणी भाजपकडून जोरदार जल्लोष पाहायला मिळत आहे. जिल्ह्यातील सावदा, भुसावळ, आणि जामनेर या ठिकाणी भाजपची ताकद आहे. त्यामुळं या भागात महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. या तिन्ही ठिकाणचे तीन नगरसेवकांची बिनविरोध निवड झाली आहे. या आयाधी सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपंचायतीमध्ये भाजपचे १७ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.

काही दिवसांपूर्वीच भाजपमध्ये प्रवेश केलेल्या माजी आमदार राजन पाटील यांच्या अनगर नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाने महाराष्ट्राचे लक्ष वेधले. कारण, मोहोळ (ेदत्र्ज्ली) तालुक्यातील अनगर नगरपंचायतीच्या नगरसेवकपदाच्या १७ जागांसाठी १७ उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याची औपचारिक घोषणा होणे बाकी असले तरी माजी आमदार राजन पाटील यांच्या समर्थकांनी फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला. मागील अनेक वर्ष राष्ट्रवादीत राहिलेल्या आणि काही महिन्यांपूर्वीच भाजपत प्रवेश केलेले माजी आमदार राजन पाटील (िररह इ्रूग) यांच्या अनगर गावातली ही निवडणूक सध्या राज्यात चर्चेचा विषय बनली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी हालचालीसा सुरुवात केली आहे. गाठी भेटी दौरे सुरु केले आहेत. सध्या नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. यासाठी अर्ज भरण्याची मुदत देखील संपली आहे. त्यामुळं काही ठिकाणी भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनगर नगरपंचायीतमध्ये भाजपचे १७ उमेदवार बिनविरोध निवडूबन आले आहेत. त्यानंतर जळगाव जिल्ह्यामध्ये देखील ३ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेह. हा महायुतीला मोठा धक्का मानला जात आहे. दरम्यान, येत्या २ डिसेंबरला नगरपालिका आणि नगरपंचायतीसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. त्यामुळं राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

### दाऊदशी संबंधित जमिनीच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी नवाब मलिकांना आरोप अमान्य, खटल्याची दैनंदिन सुनावणी जानेवारीपासून

**मुंबई/प्रतिनिधी** : अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारात राष्ट्रवादी काँग्रेस नेते नवाब मलिक यांनी ईडीने त्यांच्यावर लावलेले आरोप अमान्य असल्याचे मंगळवारी न्यायालयात सांगितले. मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एमपी-एमएलए न्यायलयात हजर राहून नवाब मलिकांनी याप्रकरणी निर्दोश असल्याचा दावा केला. त्यानंतर नवाब मालिकांविरोधात कथित मनी लाँड्रिंग प्रकरणात न्यायालयाकडून आरोपनिश्चित करण्यात आले. नवाब मलिक यांच्यावर पिएमएलए कायदा, २००२ मधील कलम ३, कलम ४ आणि कलम १७ अंतर्गत आरोप निश्चित करण्यात आले. त्यानंतर विशेष न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी डिसेंबर १९ रोजी पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुनावणी तहकूब केली. या खटल्याची दैनंदीन सुनावणी जानेवारी महिन्यापासून सुरू करू, असे आश्वासन न्यायालयाने दिले बचावपक्षाला दिलेय.



नवाब मलिकांनी दाखल केलेला दोषमुक्तीचा अर्ज फेटाळल्याच्या निर्णयाला मलिकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलेय. त्यावर सुनावणी होणे अद्याप बाकी असल्याचे कारण देत नवाब मलिकांच्यावतीने सकाळच्या सत्रात आरोपनिश्चितीची प्रक्रिया स्थगित करण्याची विनंती न्यायालयाकडे करण्यात आली. त्यावर न्यायालयाने त्यांना दुपारी तीन वाजेपर्यंत उच्च न्यायालयाकडून स्पष्टीकरण आणण्याचा अवधी दिला होता. मात्र तसं होऊ न शकल्यानं दुपारी न्यायालयान आरोपनिश्चितीची प्रक्रिया पूर्ण केली. नवाब मलिकांची ही तोंडी मागणी फेटाळताना उच्च न्यायालयानं आमदार-खासदारांविरोधातील प्रलंबित खटल्यांबाबत दाखल सुमोटो याचिकेदरम्यान दिलेल्या आदेशांचा दाखला दिला. ज्यात उच्च न्यायालयानं सर्व सत्र न्यायालयांना स्पष्ट निर्देश दिलेत की, चार आठवड्यांत सर्व प्रलंबित खटल्यांत आरोपनिश्चितीची प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकार आहे.

## नाशिककरांना भरली हुडहुडी; पारा ९.२ अंशावर, शुक्रवारपर्यंत थंडीची लाट राहणार कायम

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी** : मध्यप्रदेशासह पाच राज्यांमध्ये निर्माण झालेल्या हवेचा दाब आणि ताशी ३० किलोमीटर वेगानं वाहणाऱ्या वाऱ्यामुळं नाशिकमध्ये २१ नोव्हेंबरपर्यंत थंडीची लाट राहणार आहे. अशात मंगळवारी नाशिकचा पारा ९.२ अंश सेल्सियसपर्यंत घसरला असून निफाड तालुक्यात ८.२ अंश तापमानाची नोंद झाली आहे. ही नोंद यंदाच्या हंगामातील सर्वात कमी तापमानाची नोंद आहे.

नाशिकमध्ये थंडीचा कडाका : उत्तर भारतात होणाऱ्या हिमवृष्टीमुळे ताशी २० ते ३० किमी इतक्या वेगानं पूर्व दिशेकडून अतिशय थंड वारे महाराष्ट्राकडे वाहत आहे. नाशिक जिल्ह्यात मागील चार ते पाच दिवसापासून थंडीचा कडाका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांना दिवसभर हवेत गारवा जाणवत आहे. किमान तापमानासह कमाल तापमानात देखील सातत्याने घसरण होत असून थंडीचा कडाका प्रचंड वाढला आहे. सरासरीपेक्षा ५.१ अंशाने किमान तापमानात घट झाली आहे. तसेच पहाटे सर्वत्र धुक्याची चादर पसरत असल्याने हवामानात अधिकच गारवा जाणवत आहे. यामुळं नागरिकांना दिवसभर उबदार कपडे परिधान करावे लागत आहेत.

अशी झाली तापमानात घट

१४ नोव्हेंबर १०.९ अंश सेल्सियस
१५ नोव्हेंबर १०.७ अंश सेल्सियस
१६ नोव्हेंबर १०.३ अंश सेल्सियस
१७ नोव्हेंबर ९.६अंश सेल्सियस
१८ नोव्हेंबर ९.२ अंश सेल्सियस

द्राक्ष उत्पादक शेतकरी धास्तावला : दिवसेंदिवस थंडीचा कडाका वाढत असल्यानं द्राक्ष बागायतदार चिंतेत पडले आहेत. तापमानाचा पारा आणखीन खाली गेल्यास द्राक्ष मण्यांची फुगवण थांबते. द्राक्ष मण्यांना तडे जाणं आणि अति थंडीमुळं द्राक्ष घडांच्या पेशींचं कार्य मंदावतं. परिणामी द्राक्ष घडांचा विकास थांबतो. मात्र दुसरीकडं गहू, कांदा, हरभरा या रब्बी पिकांसाठीसाठी हे वातावरण पोषक आहे.

उबदार कपडे घेण्यासाठी गर्दी : नाशिक जिल्ह्यात गेल्या चार ते पाच दिवसांपासून थंडीचा कडाका वाढला असून दिवसभर नागरिक उबदार कपडे परिधान करून दैनंदिन कामकाज करत आहेत. तसंच थंडीमुळे स्वेटर, कानटोपी, लोकरी हातमोजे घेण्यासाठी नागरिकांची बाजारपेठेत गर्दी वाढली आहे. तसंच रात्री ठिकठिकाणी नागरिक शेकोटी करताना दिसत आहेत.

### पुणे महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांची किती पदे रिक्त; माहिती अधिकारातून स्थिती उघडकीस

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी** : पुणे महापालिकेच्या अखत्यारितील ३१३ शाळांमध्ये शिक्षकांची ३२० पदे रिक्त असल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे. मात्र, रिक्त जागांवर करार पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याचे स्पष्टीकरण महापालिकेच्या शिक्षण विभागाने दिले आहे.

आम आदमी पक्षाचे शहर उपाध्यक्ष ॲड. कृणाल घारे यांनी महापालिकेच्या शाळांतील एकूण शिक्षक, कार्यरत शिक्षक, रिक्त पदांबाबतचा तपशील माहिती अधिकार अर्जाद्वारे मागितला होता. त्याला महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी स्नेहल उकरंडे यांनी उत्तर दिले आहे. त्यानुसार महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या २३४, इंग्रजी माध्यमाच्या ४६, ऊर्दू माध्यमाच्या ३१, कन्नड माध्यमाच्या दोन अशा एकूण ३१३ शाळा आहेत.

या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची २३३, उपशिक्षकांची १ हजार ७९०, पदवीधर शिक्षकांची ८१९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी मुख्याध्यापकांची ५७, उपशिक्षकांची २४, तर पदवीधर शिक्षकांची २३९ पदे रिक्त असून, १७६ मुख्याध्यापक, १ हजार ७८२ उपशिक्षक, ५८० पदवीधर शिक्षक कार्यरत आहेत. तर मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये १४ उपशिक्षक, कन्नड माध्यमाच्या शाळांमध्ये २ उपशिक्षक अतिरिक्त असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.या अनुषंगाने माहिती अधिकार अर्जदार ॲड. कृणाल घारे, आप शिक्षक आघाडीच्या शीतल कांडेलकर म्हणाले, सरकारकडून शिक्षण सुधारणा, डिजिटल शाळा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे दावे केले जात असले, तरी स्थानिक पातळीवरील वास्तव अगदी उलट असल्याचे दिसून येते.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशिम/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरूवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या माध्यमातून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित/प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल



वाहिन्या, यू ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडीओ व्हिज्युअल डिसप्ले), ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे आदींचा समावेश होतो.

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वाशिम यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती स्थापण्यात आली आहे. या समितीत जिल्हा पोलिस अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार, नगरपरिषद, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी हे सदस्य, तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव व उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हे नोडल अधिकारीआहेत.प्रस्तावित जाहिरात प्रसारित/प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करावा लागेल. पूर्व प्रमाणनाच्या अर्जासमवेत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेसोबत दिलेला आहे.

# निवडणूक निरीक्षक ब्रिजेश पाटील यांची लोणार नगर परिषदेला भेट, निवडणूक प्रक्रियेचे केले निरीक्षण

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने लोणार नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक म्हणून वाशिमचे अतिरिक्त जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांची नियुक्ती केली असून त्यांनी मंगळवारी (दि. १८) लोणार येथे प्रत्यक्ष भेट देऊन निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण केले. दरम्यान निवडणूक निरीक्षक ब्रिजेश पाटील यांनी दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी नामनिर्देशन स्वीकारण्याच्या वेळी तसेच दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नामनिर्देशन छाननीदरम्यान लोणार येथे भेट देऊन निवडणूक कार्यपद्धतीचा आढावा घेतला.

### नागरिकांना तक्रारींसाठी आवाहन

निवडणूक प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार, अडचण अथवा गैरप्रकार आढळल्यास नागरिकांना थेट निवडणूक निरीक्षक यांच्याकडे निवेदने देता येणार आहे. तसेच त्यांनी ८९७५११९९९९ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन लोणार नगरपरिषदेच्या निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी केले आहे.

